(६६)

६६

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.

क्रमांक : कक्ष-१२/अमिन/३/पुणे/प्र.क्र.२(०८-०९)/ |08 /08-09.

नागपूर : ४४० ००१. दिनांक : 6/5/08

प्रति,
श्री. शिरीष अस्थाना
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
पुणे.

विषय : मौ. पांगळोली ता. मावळ जिल्हा पुणे येथील झालेल्या अतिक्रमणाच्या संदर्भात आरोपीविरुध्द विना विलंब कार्यवाही करणे व अतिक्रमण हटविणे बाबत

संदर्भ : आपणांस उद्देशून लिहीलेले उपवनसंरक्षक, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-३/ अमिन /१५५. दि-३/५/०७.

उपवनसंरक्षक, पुणे यांचेकडील संदर्भात नमुद केलेल्या पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सदर पत्रान्वये वन सर्व्हे क्रमांक १४ मौजे पांगळोली ता. मावळ जि. पुणे या राखीव वनात श्री. मधु प्रकाश कपूर व सौ. राधिका चेतन मेहरा यांनी ०.९९ हे. क्षेत्रामध्ये अतिक्रमण केल्याचे तालुका निरीक्षक भुमि अभिलेख आणि विभागीय कार्यालयातील सर्वेक्षक यांच्या संयुक्त मोजणी नंतर निदर्शनास आले असल्याचे उपवनसंरक्षक, पुणे यांनी आपणास कळविले आहे. सदर मोजणीत विभागीय कार्यालयातील सर्वेक्षक यांचेसमवेत तालुका निरीक्षक वडगाव मावळ यांनी दिनांक २२/०३/२००७ रोजी हद्दीच्या खुणा देखील निश्चित करुन दिल्या असल्याबाबत या पत्रात उल्लेख आहे.

२. वरीलप्रमाणे राखीव वन क्षेत्रात अतिक्रमण झाल्याचे आपल्या निदर्शनास येवूनही संबंधीत आरोपी अतिक्रमकांना त्यांनी केलेल्या वनगुन्हाच्या बाबतीत कायद्यानुसार त्यांना शिक्षा मिळविण्याकामी तसेच कायद्यात असलेल्या अधिकाराचा वापर करुन अतिक्रमण हटविण्याकामी आपण अगर आपले नियंत्रणाखाली कार्यरत उपवनसंरक्षक (प्रा.), पुणे यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. असे या कार्यालयाच्या अभिलेखावरुन दिसून येते. उलट विधी मंडळाच्या वर्ष २००८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधान सभा तारांकीत प्रश्न क्रमांक ८६७२४ (सर्वश्री राजेंद्र दर्डा व इतर वि.स.स.) आणि विधान सभा तारांकित प्रश्न क्रमांक ८३७७१ (सर्वश्री. शरद ढमाले वि.स.स.) च्या संदर्भात आपले कार्यालयाकडुन प्राप्त अहवालावरुन असेही दिसून आले आहे की, अप्रस्तुत आणि चुकीचे कारण पुढे करुन संबंधीत आरोपी अतिक्रमकाविरुध्द आपण आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करणेस टाळाटाळ करत आहात. पुणे सारख्या ठिकाणी कोट्यावधी रुपये किमतीच्या अशा मौल्यवान "राखीव वन " जमीनीवर श्रीमंत लोकांनी मोठ्या प्रमाणावर व्यापारिक

C:\MY DOCUMENTS\LANDLAND\PUNE\PANG-2.doc

माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे

दृष्टीकोणातून अतिक्रमण करुनही आपण अथवा आपले अधिनस्त उपवनसंरक्षक, पुणे हे कोणतीही प्रभावी कायदेशीर कार्यवाही करीत नसल्याची बाब अतिशय गंभीर असून याबाबत आपले स्पष्टीकरण ७ दिवसात इकडे सादर करावे. त्याच प्रमाणे याबाबत उपवनसंरक्षक, पुणे यांचेही स्पष्टीकरण बोलावून घेवून आपल्या अभिप्रायासह इकडे सादर करावे.

३. ज्याअर्थी एक वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटूनही संबंधीत अतिक्रमक आरोपी विरुध्द आपण अगर आपले नियंत्रणाखाली कार्यरत असलेले उपवनसंरक्षक यांनी आजपावतो कायद्यानुसार कोणतीही कार्यवाही केली नाही आणि शासनाचे हित जोपासण्यात सकृत दर्शनी कसूर केले आहे, त्याअर्थी शासनाचे हित जोपासण्या कामी नाइलाजाने तात्काळ अनुपालन करण्याकामी खालीलप्रमाणे आपणांस स्पष्ट सविस्तर आदेश देणे भाग पडत आहे.

अ. संबंधीत अतिक्रमकांविरुध्द कायद्यातील इतर लागू कलमांशिवाय भारतीय वनअधिनियम-१९२७ मधील कलम-२६ (१)(डी) व (एच) खाली वनगुन्हे नोंदविण्यात यावेत.

ब. संबंधीत सर्व आरोपींची तात्काळ अटक करण्यात यावी आणि कलम-२६ (१)(एच) खालील सदर वन गुन्हा हा कलम ६५ (ए) प्रमाणे बिगर जामीन पात्र गुन्हा असल्यामुळे मा. न्याय दंडाधिकारी यांचेकडुन या आरोपींना जामीन मिळणार नाही याची दक्षता घ्यावी.

क. सदर वनगुन्हा करण्याकामी वापरलेल्या सर्व साहित्यांची जप्ती भारतीय वन कायदा, १९२७ मधील कलम ५२(१) प्रमाणे करुन कायद्यानुसार त्याची संपूर्ण माहिती हद्दीचे मा. न्यायदंडाधिकारी यांचेकडे सादर करावी.

ड. सदर वनगुन्ह्याचा तपास कोणताही विलंब न लावता पुर्ण करुन हद्दीचे मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचेकडे फौजदारी खटला दाखल करण्यात यावा. या करिता न्यायालयात तक्रार दाखल करणारा अधिकारी वनक्षेत्रपाल पेक्षा कमी दर्जाचा नसावा. तसेच सदर फौजदारी प्रकरण भारतीय वन कायदा, १९२७ मधील कलम ६७ खाली शासनाने जारी केलेल्या दिनांक ३ एप्रिल १९९८ च्या अधिसुचनेनुसार समरी ट्रायल या पद्धतीने चालविण्यात यावा. अशी विनंती मा. न्यायदंडाधिकारी यांचेकडे करुन आरोपींना सक्त शिक्षा करण्याकामी त्याचप्रमाणे अतिक्रमणांसाठी वापरलेली व जप्त करण्यात आलेल्या सर्व साधन सामुग्री कलम ५५(१) प्रमाणे सरकार जमा करण्याकामी मा. न्यायमुर्तींकडे प्रार्थना करण्यात यावी. याव्यतिरिक्त वनजमिनीवर अतिक्रमण करुन आरोपींनी जंगलास जे नुकसान पोहचविलेले आहे त्याची किंमत योग्यप्रकारे आकारुन कलम २६ (१) मधील तरतुदीप्रमाणे त्याबाबतचे नुकसान भरपाई मिळण्याकरीता देखील मा. न्यायालयास प्रार्थना करावी.

(२४)

३. याशिवाय महाराष्ट्र जमिन महसूल संहिता-१९६६ मधील कलम ५३,५४ व ५४ अ अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार देखील अतिक्रमण काढून टाकण्याबाबत आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.

४. वरीलप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी. कार्यवाही करण्यास कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा हयगय होणार नाही याची दक्षता घ्यावी. असे झाल्यास आपणांस जातीने जबाबदार धरण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सात दिवसांचे आंत या कार्यालयास पाठवावा आणि प्रकरणी वेळोवेळी होणा-या प्रगतीबाबत या कार्यालयास वेळोवेळी अवगत करणेत यावे. कृपया सदरहू पत्र मिळाल्याची पावती इकडे सादर करावी.

प्रधान मुख्य वनसंरक्षक
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

प्रतिलिपी : अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे माहितीकरीता सविनय सादर. कृपया वरील बाब शासनाचे निदर्शनास आणून देणेस विनंती आहे.

प्रतिलिपी : मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी : उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना.

स्वाक्षरी/-
प्रधान मुख्य वनसंरक्षक
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे.